नवी आशा नवी दिशा
# सार्वमत

## बँक कर्मचाऱ्यांना मिळणार गुड न्यूज

**मुंबई–** बँक कर्मचारी खूप मोठ्या काळापासून कामाचा ५ दिवसांचा आठवडा करण्याची मागणी करत आहेत. २०२४ संपेपर्यंत त्यांची ही मागणी पूर्ण होण्याची शक्यता आहे. बँक कर्मचाऱ्यांना २ दिवसांची सुट्टी देण्यासंदर्भात इंडियन बँक असोसिएशन आणि कर्मचारी यूनियन यांच्यात एक सामंजस्य करारावर हस्ताक्षर झाले आहेत. २०२४ संपेपर्यंत ही मंजुरी मिळण्याची शक्यता आहे. डिसेंबरपर्यंत बँक कर्मचाऱ्यांना आठवड्यातील २ दिवस सुट्टी मिळण्याची शक्यता आहे.

## पिंपरी चिंचवडमध्ये अजित पवार गटाला धक्का?

**पुणे–** पिंपरी चिंचवडमधील अजित पवार गटाच्या माजी नगरसेवकांनी शरद पवारांची भेट घेतल्याची माहिती समोर आलीय.शहराध्यक्ष अजित गव्हाणे, राहुल भोसले, समीर मासुळकर, पंकज भालेकर यांच्यासह काही माजी नगरसेवकांनी शरद पवार यांची भेट घेतल्याची माहिती सूत्रांनी दिलीय.या भेटीचं वृत्त खरं असल्याचं पवारांनी म्हटलंय.महाराष्ट्राच्या हितासाठी एकत्र राहावं असं त्यांना वाटतं.आम्ही त्यांचं स्वागत करू असं पवारांनी म्हटलंय.भेट घेणाऱ्यांमध्ये माजी आमदार विलास लांडे यांचा मुलगा विक्रांत लांडेंचं ही नाव असल्याची माहिती सूत्रांकडून कळतेय...



### महत्त्वाचे

## राहाता बाजार समितीत कांद्याला ३३०० रुपये भाव

**राहाता (तालुका प्रतिनिधी)–** राहाता बाजार समितीत रविवारी कांद्याला जास्तीत जास्त ३३०० रुपये भाव मिळाला. कांद्याच्या एकूण ५९८६ गोण्यांची आवक झाली. कांदा नंबर १ ला २५०० ते ३३०० रुपये भाव मिळाला. कांदा नंबर २ ला १८५० रुपये ते २४५० रुपये भाव मिळाला. कांदा नंबर ३ ला ११०० रुपये ते १८०० रुपये. गोल्टी कांदा २१०० रुपये ते २४०० रुपये. जोड कांदा ५०० ते १००० रुपये. यात २६ गोण्यांना ३३०० रुपये, ६६ गोण्यांना ३२०० रुपये तर ९० गोण्यांना ३१०० रुपये प्रतिक्विंटलला भाव मिळाला. १३७ गोण्यांना ३००० रूपये, ६७० गोण्यांना २८०१ ते २९०० रुपये, ७०९ गोण्यांना २७०१ ते २८०० रुपये. ११२१ गोण्यांना २६०१ ते २७०० रुपये, ४१२ गोण्यांना २५०१ ते २६०० रुपये भाव मिळाला. ४२५ गोण्यांना २४०१ ते २५०० रुपये भाव मिळाला. २८३ गोण्यांना २३०१ ते २४०० रुपये भाव मिळाला. २९५ गोण्यांना २२०१ ते २३०० रुपये भाव मिळाला. २४४ गोण्यांना २१०१ ते २२०० रुपये भाव मिळाला. ३३९ गोण्यांना २००१ ते २१०० रुपये भाव मिळाला. ७०३ गोण्यांना १५०१ ते २००० रुपये भाव मिळाला. २९२ गोण्यांना १००१ ते १५०० रुपये भाव मिळाला. १७४ गोण्यांना २०० ते १००० रुपपये भाव मिळाला. डाळिंबाच्या ७३९५ क्रेटसची आवक झाली. डाळिंब नंबर १ ला किमान १४१ रुपये तर जास्तीत जास्त २०० रुपये प्रतिकिलोला भाव मिळाला. डाळिंब नंबर २ ला किमान ८१ रुपये तर जास्तीत जास्त १४० रुपये. डाळिंब नंबर ३ ला किमान ३१ ते जास्तीत जास्त ८० रूपये. डाळिंब नंबर ४ ला किमान १० रुपये तर जास्तीत जास्त ३० रुपये असा भाव मिळाला.

## २०२२ मध्ये ज्याला खलिस्तानी म्हटले, त्याने इतिहास रचला

**अमृतसर–** दोन वर्षांपूर्वी आशिया कप २०२२ मध्ये पाकिस्तानकडून झालेल्या पराभवानंतर ज्या अर्शदीप सिंगला लोकांनी खलिस्तानी म्हणत ट्रोल केले होते, त्याच खेळाडूने आता टी२० वर्ल्ड कपमध्ये भारताला अजिंक्य बनवले आहे. भारताने २०२४ च्या टी-२० विश्वचषकाचे विजेतेपद एका निष्कलंक विक्रमासह जिंकले. टूर्नामेंट संपल्यानंतर अर्शदीप सिंग संयुक्तपणे सर्वाधिक बळी घेणारा गोलंदाज ठरला आहे. गोलंदाजीत आपल्या चमकदार कामगिरीच्या जोरावर अर्शदीप सिंगने अफगाणिस्तानच्या फजलहक फारुकीसह आपले नाव नोंदवले आहे. दोघांनी टी-२० वर्ल्ड कपमध्ये १७ विकेट घेतल्या होत्या. अर्शदीप सिंग आणि फजलहक यांनी ८-८ सामन्यात १७-१७ विकेट घेत पहिले स्थान पटकावले आहे.

# पुण्यनगरीत लाखो वैष्णवांचा मेळा





**पुणे (प्रतिनिधी)–** टाळ, चिपळ्यांचा घणघणाट, मनामनात भक्ती रस निर्माण करणारा मृदंगनाद, अभंगावर डोलणारे वारकरी, हवेत फडफडणाऱ्या भगव्या पताका, डोक्यावर तुळशी वृंदावन, कपाळी चंदनाचा टिळा, गळा तुळशी माळा आणि मुखी ज्ञानोबा, तुकोबाचा जयघोष असे भक्तीमय वातावरण. पालखी मार्गावरील रांगोळ्यांच्या पायघड्या, चौकाचौकांत साकारण्यात आलेल्या भव्य रांगोळी, रस्त्यांच्या दुतर्फा स्वागत करणारे बॅनर, फलेक्स आणि रंगीबेरंगी फुलांनी सजविलेले पालख्यांचे रथ दृष्टीपथास पडताच पुणेकरांनी मनोभावे घेतलेले दर्शन अशा प्रसन्न व उत्साही वातावरणात रविवारी पुण्यनगरीत लाखो वैष्णवांचा मेळा दाखल झाला.

लाखो भक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या जगद्गुरू संत तुकाराम महाराज व संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालख्यांचे वैष्णवांच्या मेळ्यासह आगमन झाले. वैष्णवांचा महासागर आणि ज्ञानोबा-तुकारामाच्या गजराने अवघे शहर दुमदुमले. पालख्या दृष्टीपथात पडताच पुणेकर मनोभावे हात जोडून कृतार्थ झाले. सकाळपासूनच पुणेकरांनी पालखी दर्शनाची आस लागली होती. त्यामुळे पालखी मार्गासह संपूर्ण शहरात स्वागताची लगबग सुरू होती. दुपारी देहू वारकरी शहरात येणाऱ्या सुरूवात झाली. आणि पुणेकरांच्या आनंदाला पारावार उरला नाही. पालखी मार्गावर पुणेकर वारकऱ्यांच्या सेवेत रमले.

पालख्यांच्या दर्शनासाठी पुणेकर दरवर्षी आतूर असतात. यंदाही पालखी दर्शनाची ओढ पुणेकरांना लागली होती. संतांच्या पालख्या डोळ्यात साठविण्यासाठी पालखी मार्गावर पुणेकरांनी दुतर्फा गर्दी केली होती. दरवर्षीप्रमाणे, यंदाही दोन्ही पालखी सोहळ्यात वारकऱ्यांची आदर्शवत स्वयंशिस्त अनुभवायला मिळाली. पाटील इस्टेट चौकात पालख्यांचे आगमन होताच पुणेकरांनी पुष्पवृष्टी करीत मोठ्या भक्तिभावाने पालख्यांचे स्वागत केले. या वेळी जमलेल्या भक्तांनी तसेच वारकऱ्यांनी संत तुकाराम आणि संत ज्ञानेश्वर महाराजांच्या नामाचा जयघोष केला. या जयघोषाने संपूर्ण वातावरण भक्तीमय झाले.

शहरात सकाळ पासूनच ऊन पावसाचा खेळ सुरू होता. दुपार नंतर पाऊस थांबला. मात्र ढगाळ वातावरण कायम होते. त्यामुळे वारकऱ्यांच्या चेहऱ्यावर थकवा जाणवत होता. मात्र, उत्साह कायम होता. तुकोबांची पालखी पिंपरीहून, तर माऊलींची पालखी आळंदीतील गांधी वाड्यातून पुण्याच्या दिशेने मार्गस्थ झाली. वारकरी टाळ-मृदंगांच्या घणघणाटासह अभंगांच्या तालावर आनंदाने नाचू-डोलू लागले. त्यांच्या चेहऱ्यावर उत्साह ओसंडून वाहत होता. तुकोबांच्या पालखीने दुपारी दापोडीत विसावा घेतला. त्यानंतर पालखी पुढे मार्गस्थ झाली.

सायंकाळी ५.५ वाजता रंगीबेरंगी फुलांनी सजविलेला चांदीचा रथ पाटील इस्टेट चौकात पुणेकरांच्या दृष्टिपथास पडला. तुकोबांची पालखी आणि रथातील पादुका दिसताच भाविक कृतकृत्य झाले. काहींना पादुका दर्शनाचे भाग्य लाभले. तुकोबांच्या आगमनानंतर माऊलींच्या पालखी दर्शनासाठी भक्तांना सुमारे पावने दोन तास वाट पाहावी लागली. सायंकाळी ६.५० वाजता आकर्षक फुलांनी सजविलेल्या रथातून माऊली प्रकटले अन् भाविकांच्या आनंदाला पारावार उरला नाही. माऊलींच्या पादुकांवर माथा टेकविण्यासाठी एकच झुंबड उडाली. पादुकांचे दर्शन काहींनाच प्राप्त झाले. मात्र, धन्यत्वाचा अनुभव सर्वांनीच घेतला. पाटील इस्टेट चौकात तुकोबा व ज्ञानेश्वर माऊलींच्या रथावर फुलांची उधळण करण्यात आली. वारकऱ्यांचा हा भक्तिप्रवाह संचेती चौक, फर्ग्युसन रस्ता मार्गे ज्ञानेश्वर पादुका चौक व तुकाराम पादुका चौक येथे विसावला. तेथे ज्ञानोबा-तुकारामचा एकच गजर झाला. पालख्यांच्या दर्शनासाठी पालखी मार्गाच्या दोन्ही बाजूंनी भक्तांनी मोठी गर्दी केली होती. फर्ग्युसन रस्त्यावर ठिकठिकाणी वारकऱ्यांचे स्वागत करणारे फलक लावण्यात आले होते. सामाजिक संस्था, मंडळे, राजकीय व्यक्ती, खासगी कार्यालयांतर्फे वारकऱ्यांना खाद्यपदार्थांचे वाटप करण्यात आले. टिळक चौकातही पालख्यांचे स्वागत करणारी रांगोळी साकारण्यात आली होती. संपूर्ण पालखी मार्गावर पुणेकर वारकऱ्यांच्या सेवेत दंग झाल्याचे चित्र पाहण्यास मिळाले. तुकाराम महाराजांची पालखी नानापेठेतील श्री निवडुंगा विठ्ठल मंदिर येथे; तर माऊलींची पालखी भवानी पेठेतील पालखी विठोबा मंदिर येथे रात्री उशिरा विसावली.

**...त्या मुलांची दिंडी ठरले आकर्षण**

दरवर्षी राज्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांची मुले दिंडीत सहभागी होत असतात. यंदाही पालखी सोहळ्यात या मुलांच्या दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. 'आत्महत्या करू नका' असा हातात फलक घेऊन संदेश देत ही मुले चालत होती. त्यामुळे आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांच्या दिंडीने पुणेकरांचे लक्ष वेधून घेतले. दिंडीतील मुलांनी संत तुकाराम आणि संत ज्ञानेश्वर माऊलीच्या नावाचा जयघोष करत. शेतकऱ्यांनो आत्महत्या करू नका, असा संदेशही दिला.

# वर्ल्ड कप विजेती टीम इंडिया मालामाल बीसीसीआयकडून १२५ कोटींचं बक्षीस



**नवी दिल्ली–** टी-२० वर्ल्ड कप फायनलमध्ये दक्षिण आफ्रिका संघाचा पराभव करत टीम इंडियाने वर्ल्ड कपवर नाव कोरलं. या विजयासह गेल्या ११ वर्षांपासूनचा आयसीसीच्या ट्रॉफीचा दुष्काळ रोहितसेनेने संपवला.

टी-२० क्रिकेट वर्ल्ड कप टीम इंडियाने दुसऱ्यांदा जिंकला आहे. १३० कोटी भारतीयांचं स्वप्न पूर्ण करणाऱ्या टीम इंडियाच्या खेळाडूंसाठी बीसीसीआयने आपला पेटारा उघडला आहे. वर्ल्ड विजेत्या टीमसाठी बीसीसीआयचे सचिव जय शाह यांनी १२५ कोटींचं बक्षीस जाहीर केलं आहे. आयसीसी टी२० वर्ल्ड कप २०२४ जिंकल्याबद्दल टीम इंडियासाठी १२५ कोटी रुपयांची बक्षीस रक्कम जाहीर करताना मला आनंद होत आहे. संघाने संपूर्ण स्पर्धेत प्रतिभा, दृढनिश्चय आणि खिलाडूवृत्तीचे प्रदर्शन केले आहे. उत्कृष्ट कामगिरीसाठी सर्व खेळाडूंचे, प्रशिक्षकांचे आणि चाहत्यांचे अभिनंदन, असं जय शहा यांनी म्हटलं आहे.



विराट-रोहितला निवृत्तीनंतर पेन्शन मिळणार

**नवी दिल्ली–**विराट कोहली आणि रोहित शर्मा यांनी टी२० फॉरमॅटमधून रिटायरमेंट घेणे, हा भारतीयांसाठी दुहेरी धक्का होता. कोहली आणि रोहितने टीम इंडियासाठी उत्कृष्ट कामगिरी केली आहे. कोहलीने कर्णधार पदावर असताना दमदार कामगिरी केली आहे, तर रोहित शर्माही कर्णधार म्हणून यशस्वी ठरला आहे. कोहलीनंतर रोहितला कर्णधारपदाची जबाबदारी देण्यात आली होती, ज्यात तो यशस्वी ठरला. रोहित आणि कोहलीच्या निवृत्तीने एका युगाचा अंत झाला, अशी प्रतिक्रिया उमटत आहे. किंग कोहलीने अनेक टी-२० आंतरराष्ट्रीय विक्रम केले आहेत, जे कोणत्याही खेळाडूला तोडणं सोपं नाही.

विश्वचषकात रोहित शर्माने चांगली कामगिरी केली. संपूर्ण स्पर्धेत कर्णधार रोहित शर्माने स्वतः फलंदाजी करत आघाडी घेतली. त्यानंतर अंतिम सामन्यात जेव्हा कर्णधार रोहित शर्मा स्वस्तात बाद झाला. त्यानंतर टीम इंडियाचा दिग्गज खेळाडू विराट कोहलीने जबाबदारी स्वीकारली आणि संघाला चांगल्या धावसंख्येपर्यंत पोहोचवलं. अंतिम सामन्यानंतर रोहित शर्मा आणि विराट कोहली या भारतीय संघातील दोन दिग्गज खेळाडूंनी टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटला अलविदा केला. आता त्यांना पेन्शन देणार का, असा प्रश्न अनेकांना पडला आहे.

बीसीसीआय भारतीय क्रिकेटपटूंना निवृत्तीनंतर पेन्शन देते. यासाठी बीसीसीआयचे काही नियम आणि कायदे आहेत. यासाठी खेळाडूंना ठराविक प्रमाणात सामने खेळावे लागतात. त्या आधारे खेळाडूला पेन्शन दिली जाते. बीसीसीआयचा पेन्शन स्लॅब प्रथम श्रेणी सामने आणि कसोटी क्रिकेट सामन्यांच्या आधारे तयार करण्यात आला आहे.

जर एखाद्या खेळाडूने भारतासाठी २५ पेक्षा जास्त कसोटी सामने खेळले असतील तर त्याला दरमहा ७०,००० रुपये पेन्शन म्हणून दिली जाते. तर २५ पेक्षा कमी कसोटी सामने खेळणाऱ्या क्रिकेटपटूंना दरमहा ६०,००० रुपये पेन्शन दिली जाते. यामुळे रोहित शर्मा आणि विराट कोहली या दोघांनाही पेन्शन मिळणार आहे.

भारतीय क्रिकेट नियामक मंडळ हे जगातील सर्वात श्रीमंत क्रिकेट बोर्ड आहे. बीसीसीआयमध्ये केवळ माजी आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटूंसाठीच नाही तर प्रथम श्रेणी क्रिकेट खेळणाऱ्या क्रिकेटपटूंनाही पेन्शनची तरतूद आहे. पेन्शन स्लॅब अंतर्गत, २००३ पूर्वी प्रथम श्रेणी क्रिकेटमधून निवृत्त झालेले आणि १ ते ७४ सामने खेळलेले क्रिकेटपटू. त्यांना दरमहा ३० हजार रुपये निवृत्ती वेतन दिले जाते. ७५ पेक्षा जास्त प्रथम श्रेणी सामने खेळणाऱ्या खेळाडूंना ४५,००० रुपये पेन्शन मिळते. बीसीसीआय महिला क्रिकेटपटूंनाही पगार देते. ५ ते ९ कसोटी खेळलेल्यांना ३०,००० रुपये दिले जातात.

## मुंबई सत्र न्यायालयाच्या न्यायाधीशांची बदली

**मुंबई–** मुंबई सत्र न्यायालयातील न्यायाधीश राहुल रोकडे यांची बदली झाली आहे. रोकडे अनेक सत्ताधारी आमदार आणि मंत्र्यांविरोधातील खटल्यांचे न्यायाधीश होते. शिखर बँक घोटाळा, महाराष्ट्र सदन, भोसरी भुखंड घोटाळा या प्रकरणाचे खटले रोकडे यांच्या काळात अंतिम टप्प्यात होते. असं असताना त्यांची बदली करण्यात आली आहे. न्यायाधीश राहुल रोकडे शिखर बँक घोटाळाप्रकरणी १२ जुलैला सुनावणी घेणार होते. याच दरम्यान रोकडे यांची दिंडोशी येथील सत्र न्यायालयात बदली झाली आहे.

रोकडे यांनी नुकतंच एका सुनावणीवेळी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना एका प्रकरणात ३ हजार रुपयांचा दंड ठोठावला होता. तसेच राज्य मध्यवर्ती ग्रंथालय घोटाळा प्रकरणी मंत्री छगन भुजबळ यांना वॉरंटचा इशाराही दिला होता. विशेष म्हणजे शिखर बँक घोटाळा प्रकरणात मुंबई पोलिसांनी अजित पवारांना क्लिन चिट दिली आहे. पण त्याविरोधात ईडीने कोर्टात धाव घेतली आहे. याच प्रकरणी आता येत्या १२ जुलैला सुनावणी होणार होती पण त्याआधीच रोकडे यांची बदली करण्यात आली आहे.

# सह्याद्रीच्या घाटमाथ्यावर पाऊस पण जोर नाही

## धरणात आवक नाहीच, जुलै-ऑगस्टच्या पावसावरच धरणांची भिस्त

**राहाता (तालुका प्रतिनिधी)–** सह्याद्रीच्या घाटमाथ्यावर पावसाचे आगमन होत आहे. परंतु पावसात म्हणावा असा जोर नाही! त्यामुळे धरणांमधील पाणीसाठ्यात जून उलटून गेला तरी वाढ नाही. गोदावरी कालव्यांच्या लाभक्षेत्रातही पावसाचे प्रमाण असमान आहे.

जून महिना धरणांच्यादृष्टीने समाधानकारक राहिला नाही. आता जुलै महिन्याला प्रारंभ झाला. जुलै ऑगस्ट या दोन महिन्यांत जोरदार पावसाची अपेक्षा आहे. सह्याद्रीच्या घाटमाथ्यावर पावसाने उग्ररुप धारण केले तर आणि सलगता टिकून राहिली तर धरणं अल्पवेळेत भरतात. यंदा जूनमध्ये घाटमाथ्यावर मान्सून उशीरा सक्रिय झाला. सक्रिय असूनही जूनमध्ये मात्र या पावसात जोर नव्हता. त्यामुळे अद्यापपर्यंत उपयुक्त साठ्यात नविन पाण्याची आवक कोणत्याच धरणात झाली नाही. परिणामी धरणं खपाटीच आहेत. पाऊस होतो पण तो कमी आधिक प्रमाणात पडतो आहे. बेरजेलाच वाढतो आहे.

पावसाची धरणांच्या पाणलोटातील स्थिती- काल सकाळी ६ वाजेपर्यंत मागील २४ तासांतील पाऊस तसेच कंसात १ जून पासून पडलेला एकूण पाऊस - दारणा १० मिमी (१२२ मिमी), भावली ७१ मिमी (२९७ मिमी), वालदेवी ५ मिमी (८८ मिमी), वाकी १४ मिमी (१७० मिमी), भाम २८ मिमी (१४८ मिमी), मुकणे १५ मिमी (११५ मिमी), गौतमी गोदावरी ३ मिमी (५२ मिमी), कडवा ० मिमी (६४ मिमी), गंगापूर ० मिमी (९३ मिमी), त्र्यंबक ८ मिमी (१८७ मिमी), नाशिक ३ मिमी (१३६ मिमी). घोटी व इगतपुरी या घाटमाथ्यावरील पावसाची आकडेवारी उपलब्ध नाही.

गोदावरी कालव्यावरील पाऊस- देवगाव ० मिमी (१९७ मिमी), ब्राम्हणगाव ८ मिमी (१२७ मिमी), कोपरगाव ० मिमी (९३ मिमी), पढेगाव ० मिमी (२५ मिमी), सोमठाणा ० मिमी (२०२ मिमी), कोळगाव ० मिमी (१३९ मिमी), सोनेवाडी ० मिमी (८२ मिमी), शिर्डी ० मिमी (११९ मिमी), राहाता ० मिमी (११७ मिमी), रांजणगाव ० मिमी (१७१ मिमी), चितळी ० मिमी (१४० मिमी) असा पाऊस नोंदला गेला आहे.

धरणांचे पाणी साठे- दारणा ३.४२ टक्के (उपयुक्तसाठा २५९ दलघफू), गंगापूर १८.३१ टक्के (१०३१ दलघफू), पालखेड १५.१६ टक्के (९९ दलघफू), कडवा ६.३४ टक्के (१०७ दलघफू), मुकणे २.१७ टक्के (१५७ दलघफू), भोजापूर ० टक्के, आळंदी १.१० टक्के (९ दलघफू), कश्यपी १३.६६ टक्के (२५३ दलघफू), वालदेवी ० टक्के, गौतमी गोदावरी ९.८५ टक्के (१८४ दलघफू), भावली ० टक्के, वाकी ० टक्के, भाम ० टक्के अशी धरणांची स्थिती ३० जून अखेरची आहे. नाशिक जिल्ह्यातील धरणांमध्ये ५.३८ टक्के पाणीसाठा आहे. कालच्या तारखेला मागील वर्षी हा साठा १८.६५ टक्के होता.

सार्वमत
हे दैनिक मुद्रक व प्रकाशक राजेंद्र कृष्णराव सोनवणे यांनी श्रीरंग प्रकाशन प्रा.लि. यांच्याकरिता प्लॉट क्र. एन.११, एम.आय.डी.सी, अहमदनगर येथे मुद्रित करुन प्लॉट क्र. एन. ११, एम.आय.डी.सी, अहमदनगर ४१४१११ येथे प्रसिध्द केले आहे. ● संपादक- ✻ अनंत सा. पाटील : ☎ (०२४२२) २२२४६४,२२२६२९. फॅक्स : २२२७९४. अहमदनगर कार्यालय : ☎ (०२४१) २४३११०३/०४ फॅक्स : (०२४१) २४३११०५. R.N.I Regi. No. 31816/1976. पोस्टाने पाठविण्याचा परवाना क्र. रजि. नं. बी.आय.आय./आर.एन.पी./एस.आर.पी./००३/२०२१-२३ (✻ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे)